कुलसचिव कार्यालय
जा. क्र. 2062
दि. 12/07/2023

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ : http://sus.ac.in ई-मेल : affiliation@sus.ac.in विस्तारित क्र.: १२२



## शैक्षणिक, संशोधन आणि विकास (संलग्नता विभाग)

**जा. क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२२-२३/** दिनांक :

### अत्यंत महत्वाचे परिपत्रक

**वाचा :** १) शासन निर्णय क्र. २०१०/(२०/१०)/विशि-३, दिनांक ०८/१०/२०१०.
२) विद्यापीठ पत्र क्र. SOL/BCUD/AFFI/६६६/५६०३, दिनांक १४/१०/२०१०.
३) विद्यापीठ पत्र क्र. SOL/BCUD/AFFI/८५५/६६८८, दिनांक ११/११/२०१०.
४) विद्यापीठ पत्र क्र. SUS/VC/१७३, दिनांक २०/११/२०१३.
५) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/१८४४, दिनांक १९/०५/२०१४.
६) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/३७८४, दिनांक २१/०७/२०१५.
७) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/३५२२, दिनांक ०६/०४/२०१६.
८) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/७८६९, दिनांक १६/०८/२०१६.
९) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०१९/८२१५, दिनांक २५/१०/२०१९.
१०) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. अ.शा.क्र. के आर ए-२०२२/प्र.क्र.-१९६/वि, दिनांक १९/०७/२०२२.
११) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२२/नॅक/ अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/१०१००, दिनांक २७/०७/२०२२.
१२) मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या पत्र क्र. विससं/उशि/सोविसो/२०२२/१५२८, दिनांक ०३/०८/२०२२.
१३) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/६२९७, दिनांक १८/०८/२०२२.
१४) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२२/नॅक/अशा. अनु.म.वि./औवि/मवि-३/१२२०२, दिनांक ०३/१०/२०२२.
१५) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/८६२३, दिनांक ०७/११/२०२२.
१६) मा. JBVC च्या संदर्भातील दिनांक ०५/०१/२०२३ रोजीच्या आढावा बैठकीतील मुद्दा क्र.१४.
१७) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/१८०१, दिनांक १५/०३/२०२३.
१८) मा. प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२३/नॅक/अशा. अनु.म.वि./औवि/मवि-३/६४६२, दिनांक २३/०५/२०२३.
१९) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/३५५७, दि. ०५/०६/२०२३.
२०) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी / २०२३ / नॅक / अशा.अनु.म.वि. / औवि/मवि-३/७२४८, दि. २०/०६/२०२३.

महोदय / महोदया,

महाराष्ट्र शासनाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाकडून संदर्भ क्र. २ ते ९, १३ व १५ येथील पत्रान्वये शासनाच्या धोरणानुसार महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन व पुढील Cycle नुसार पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेण्याच्या दृष्टीने यापूर्वी वारंवार कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दि. ०४/०२/२०२३ रोजी मार्गदर्शनपर बैठकीमध्ये सर्व संलग्नित महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे अनिवार्य असल्याचे निर्देशित केले होते, ही बाब आपणांस संदर्भ क्र. १७ अन्वये कळविण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी मा. प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी संदर्भ क्र. १८ अन्वये विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जी महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदी व शासन निर्णयात नमूद केलेल्या नॅक मूल्यांकन, मानांकन व

पुनर्मूल्यांकन करण्यासाठी अटी व शर्तीचे पालन करणार नाहीत अशा महाविद्यालयांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीचा अवलंब करुन महाविद्यालयाची संलग्नता काढून घेण्याची कारवाई विद्यापीठाने करणेबाबत संचालनालयाने आदेशित केले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. सदर प्रकरणी संदर्भ क्र. १९ अन्वये विद्यापीठाकडून उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा असे सूचित करण्यात आले होते. त्याअनुषंगाने काही महाविद्यालयांनी नॅकची माहिती विद्यापीठास सादर केली आहे तर काही महाविद्यालयांनी माहिती सादर केलेली नाही. सदर प्रकरणी मा. शिक्षण संचालक यांनी संदर्भ क्र. २० च्या अनुरोधाने ऑनलाईन बैठक आयोजित करुन विद्यापीठाकडील माहिती घेतलेली आहे.

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी संदर्भ क्र. १८ अन्वये निर्देशित केल्यानुसार व दि. २०/०६/२०२३ रोजीच्या ऑनलाईन बैठकीत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने पुन:श्च कळविण्यात येते की, अद्यापपर्यंत एकदाही नॅक मूल्यांकन व मानांकन न झालेल्या अनुदानित महाविद्यालये व सद्यस्थितीत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन Inactive असलेल्या अनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्ष प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. ज्या महाविद्यालयांनी / मान्यताप्राप्त परिसंस्थांनी एकदाही IIQA नॅक कार्यालयास सादर केलेले नाही व महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन व मानांकन झालेले नाही, अशा महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षाकरीता कोणत्याही अभ्यासक्रमास विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय विद्यार्थी प्रवेशित करु नयेत. विद्यार्थ्यांचे प्रवेश केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था/प्राचार्य/संचालक/महाविद्यालयाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

आपली स्नेहांकित,

१४/७/२३

( योगिनी घारे )
कुलसचिव

जा. क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/ 4310
दिनांक : 12 JUL 2023

प्रति,

**मा. प्राचार्य / संचालक ,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :

१) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे.
२) मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर.
३) परीक्षा व मूल्यमापन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
४) पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.